## बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने झेरॉक्स मशीन बसविणेसाठी जाहीर नोटीस

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर व अधिपत्याखालील तालुका न्यायालयांमध्ये नक्कल विभाग तसेच कार्यालयीन कामकाजाच्या वापरासाठी लागणारे झेरॉक्स मशीन खालीलप्रमाणे नमुद केलल्या क्षमतेची बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने २३ नग झेरॉक्स मशीन्स बसविणेस व जिल्हा न्यायालय, कोल्हापूर, जिल्हा न्यायालय - १ जयसिंगपूर, इचलकरंजी, गडहिंग्लज व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर कोल्हापूर येथील न्यायालयामध्ये "मनुष्य बळासहीत" सेवा पुरविणेसाठी निवीदा मागविणेत येत आहेत. तरी इच्छुक सेवा पुरवठादारानी खालील अटीस पात्र राहून दि. २३/०४/२०२५ इ. रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे पोहचतील अशा रितीने निवीदा सादर करावी. तसेच उपरोक्त कालावधीमध्ये प्राप्त होणा-या निवीदा/दरपत्रक दि. २३/०४/२०२५ इ. रोजी सा. ५.०० वाजता मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीशसो यांचे निजी कक्षात उघडणेत येतील याची निवीदाधारकांनी नोंद घ्यावी.

हुकूमावरुन,

सहा. अधिक्षक (वित्त विभाग)

दिनांक. ०३/०४/२०२५ जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर.

DISTRICT COURT OF KOLHAPUR
डिस्ट्रिक्ट कोर्ट
सत्यमेव जयते
कोल्हापूर

जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व अधिपत्याखालील खाली नमुद केलेल्या ठिकाणी व नमुद केलेल्या क्षमतेची झेरॉक्स मशीन बसविणेची आहेत.

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | झेरॉक्स मशीनचा प्रति मिनीट निघणा-या कॉपीचा वेग |
|---|---|---|
| १ | जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर नक्कल विभाग | ७५ कॉपीज प्रति मिनीट |
| २ | जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर रेकॉर्ड विभाग | ३५ कॉपीज प्रति मिनीट |
| ३ | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर | ३५कॉपीज प्रति मिनीट |
| ४ | मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, कोल्हापूर | ३५ कॉपीज प्रति मिनीट |
| ५ | जिल्हा न्यायाधीश-१ इचलकरंजी | २५ कॉपीज प्रति मिनीट |
| ६ | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, इचलकरंजी | २५ कॉपीज प्रति मिनीट |
| ७ | सह. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, इचलकरंजी (Civil Section) | २० कॉपीज प्रति मिनीट |
| ८ | सह.दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, इचलकरंजी (Criminal Section) | २० कॉपीज प्रति मिनीट |
| ९ | जिल्हा न्यायाधीश-१, जयसिंगपूर | २५ कॉपीज प्रति मिनीट |
| १० | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, जयसिंगपूर | २० कॉपीज प्रति मिनीट |
| ११ | जिल्हा न्यायाधीश-१ गडहिंग्लज | २५कॉपीज प्रति मिनीट |

| | | |
|---|---|---|
| १२ | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, गडहिंग्लज | २० कॉपीज प्रति मिनीट |
| १३ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, गडहिंग्लज | २० कॉपीज प्रति मिनीट |
| १४ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, कागल | २५ कॉपीज प्रति मिनीट |
| १५ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, पन्हाळा | २० कॉपीज प्रति मिनीट |
| १६ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, पेठवडगांव | २५ कॉपीज प्रति मिनीट |
| १७ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, आजरा | २० कॉपीज प्रति मिनीट |
| १८ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, राधानगरी | २० कॉपीज प्रति मिनीट |
| १९ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, चंदगड | २० कॉपीज प्रति मिनीट |
| २० | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, गारगोटी | २० कॉपीज प्रति मिनीट |
| २१ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, कुरुंदवाड | २० कॉपीज प्रति मिनीट |
| २२ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, मलकापूर-शाहुवाडी | २० कॉपीज प्रति मिनीट |
| २३ | दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, कळे-खेरीवडे | २० कॉपीज प्रति मिनीट |

## बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने व "मनुष्य बळासहीत" झेरॉक्स मशीन बसविणेकरीताच्या नियम व अटी खालीलप्रमाणे.

१) पुरवठादारांनी झेरॉक्स मशीन्सची सेवा जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व अधिपत्याखालील तालुका न्यायालयमध्ये एकूण २३ झेरॉक्स मशीनबाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने बसविणेचे आहे. तसेच जिल्हा न्यायालय -१ जयसिंगपूर, इचलकरंजी, गडहिंग्लज व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, कोल्हापूर येथे मनुष्य बळासहित सेवा पुरविणे बंधनकारक राहिल यांची नोंद घ्यावी.

२) जी. एस. टी. चे बील असणा-या पुरवठादारांना प्राधान्य दिले जाईल.

३) करार काळात छायांकीत प्रति काढणेसाठी लागणारी शाई, कागद तसेच झेरॉक्स मशीनमध्ये काही बिघाड झालेस त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत पुरवठादाराची राहील.

४) निवीदा भरत असताना पुरवठादारांनी कॉपीजचा दर वेगळा व जी. एस. टी. वेगळी अशाप्रकारे निवीदा भराव्यात.

५) एखादया झेरॉक्स मशीनमध्ये बिघाड झाल्यास त्याठिकाणी तात्काळ दुसरे झेरॉक्स मशीन पुरवठादाराने उपलब्ध करून देणे किंवा त्याची ताबडतोब दुरूस्ती करणेची जबाबदारी संबंधीत पुरवठादाराची राहील.

६) महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निवीदा भरु नयेत, अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

७) निवीदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतीम अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश कोल्हापूर यांना राहतील.

८) एखादया निवीदाधारका विरुध्द दिवाणी दावा अथवा फौजदारी खटला जिल्हा व सत्र न्यायालय,कोल्हापूर किंवा अधिपत्त्याखालील तालुका न्यायालयामध्ये प्रलंबीत असल्यास त्यांनी निवीदा भरु नयेत, तसे निदर्शनास आलेस कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

९) पुरवठादारांनी या कार्यालयाने ज्या प्रकारच्या कंत्राटी पध्दतीने झेरॉक्स मशीन मागणीची निवीदा प्रसिध्द केलेली आहे. त्याच प्रकारच्या मशीनची निवीदा भरणेची आहे. अन्य निवीदेचा विचार केला जाणार नाही.

१०) पुरवठादारांना निवीदेमधील प्रति कॉपी दराव्यतिरीक्त इतर कोणताही इतर खर्च अथवा भाडे दिले जाणार नाही.

११) झेरॉक्स मशीन पुरवठादारांनी संपुर्ण २३ मशीन ही ए३ साईजची छायांकीत प्रत काढणेचे योग्यतेची मशीन पुरविणे आवश्यक आहे. तसेच सदर मशीनचा छायांकीत प्रत काढणेचा वेग हा दर मिनीटास २० ते ७५ प्रत असणे आवश्यक आहे.

१२) सर्व मशीनसाठी लागणारा कागद तसेच इतर साहित्य व सेवा हया पुरवठादारांनी ज्यात्या ठिकाणी स्वखर्चाने देणेची आहे.

१३) पुरवठादारांनी दर्जेदार तसेच ७० जी. एस. एम जाडीचा कागद पुरविणे आवश्यक आहे.

१४) पुरवठादारांनी रु. ५०००/- इतक्या रक्कमेची बँक गॅरंटी देणे बंधनकारक आहे.

१५) पुरवठादारांनी सदर मशीनच्या वीजबीलापोटी येणारा खर्च प्रति कॉपी पैसे २.२६ इतका शासनासाठी प्रदान करणेचा आहे. त्यामुळे सदर कॉपीजचा दर भरताना वीजबीलासह भरणेचा आहे.

१६) खराब होणा-या कॉपीजपोटी एकुण बीलाचे ३ टक्के वेस्टेज म्हणून बीलामध्ये पुरवठादारांनी सुट देणेची आहे.

१७) पुरवठादारांनी झेरॉक्स मशीनचे रिडींग दर महिन्याच्या अखेरीस घेवून त्याचे बील मा. उच्च न्यायालय,मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे प्रतवारी करून तात्काळ ज्यात्या न्यायालयांकडे पाठविणेची जबाबदारी राहील.

१८) झेरॉक्स मशीनचे झालेले बील हे उपलब्ध अनुदान तसेच देयक कोषागारातून पारीत झालेनंतर अदा करणेत येईल.
१९) झेरॉक्स मशीन ज्यात्या न्यायालयामध्ये जाउन जोडणीचा खर्च पुरवठादारांनी करणेचा आहे.
२०) सदर कराराचा कालावधी एक वर्षाचा असेल याची पुरवठादारांनी नोंद घेणेची आहे.
२१) झेरॉक्स काढणेसाठी लागणारे मनुष्यबळ हे पुरवठादारांनी पुरविणे आहे.
२२) पुरवठादारांनी ए३, ए४ व लिगल साईजचा कागद पुरवठा करणे बंधनकारक आहे.
२३) पुरवठादारांनी झेरॉक्स मशीनचालकांचा गटविमा काढणे आवश्यक आहे.

प्रत माहितीकरीता व नोटीसबोर्डवरती प्रसिध्द करणेकरीता.

१. संगणक विभागप्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सुचित करणेत येते की, सदरील जाहीरात जिल्हा न्यायालय, कोल्हापूर या कार्यालयाच्या http://ecourts.gov.in/kolhapur या वेबसाईटवरती प्रकाशीत करणेत यावी.
२. मा. जिल्हाधिकारीसो कोल्हापूर.
३. मा. तहसिलदारसो, कोल्हापूर.
४. मा. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर.
५. मा. दिवाणी न्यायालय, कोल्हापूर.
६. मा. मुख्यन्यायदंडाधिकारीसो, कोल्हापूर.
७. कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.